बन्सीलाल रामनाथ अगरवाल चॅरिटेबल ट्रस्ट संचलित
विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी
(सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न स्वायत्त संस्था)
(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)
६६६, अप्पर इंदिरानगर, बिबवेवाडी, पुणे - ४११ ०३७.
Approved by A. I. C. T. E. New Delhi

Bansilal Ramnath Agarwal Charitable Trust's
Vishwakarma Institute of Technology
An Autonomous Institute Affiliated to Savitribai Phule Pune University
(Formerly University of Pune)
666, Upper Indiranagar, Bibwewadi, Pune - 411 037.
Identification No. - PU/PN/Engg./061/(1984)

नोटीस नं. 265 | नोटीस | दि :२२/१२/२०२४

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना २०२४-२५ करिताचे ऑनलाईन अर्ज सादर करण्यास शासनाकडून जाहीर झालेल्या दि. ३१ डिसेंबर २०२४ च्या मुदतवाढीबाबत.**

शसनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाव्दारा **अनुसूचित जाती (SC) प्रवर्गातील विद्यार्थ्यांना तसेच नबौध्द** या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना **भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना** सुरू केलेली आहे. सदर योजना ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न **रूपये २,५०,०००/-** आहे व **जे विद्यार्थी पुणे मधील स्थानिक नाहीत** अशा विद्यार्थ्यांना निवार्हभत्ता, भोजन शुल्क व निवास भत्ता अशी एकूण रक्कम **रूपये ६०,०००/- एवढी रक्कम** शासनाच्या सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभागाव्दारे मंजूर केलेली जाणार आहे. त्याअनुषंगाने विद्यार्थ्यांनी **दि. ३१/१२/२०२४** पूर्वी **https://hmas.mahait.org** या संकेतस्थळावरून ऑनलाईन अर्ज भरून त्याची प्रत कागदपत्रानिशी महाविद्यालयात वरील मुदतीत सादर करावेत.

विद्यार्थ्यांनी सादर केलेले स्वाधार योजना २०२४-२५ चे सर्व अर्ज मा. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, विश्रांतवाडी, पुणे यांचे कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक आहे तरी विद्यार्थ्यांनी त्यांचे स्वाधार योजनेचे परिपूर्ण भरलेले अर्ज व कागदपत्रे खालीलप्रमाणे जोडून महाविद्यालयास सादर करावीत.

१) जातीचा दाखला (Caste Certificate)
२) विद्यार्थ्याने कोणत्याही शासकीय वसतिगृहात प्रवेश घेतला नसल्याचे शपथपत्र.
३) विद्यार्थी स्थानिक रहिवासी नसल्याबाबतचे प्रमाणपत्र.
४) विद्यार्थी महाविद्यालयाच्या वसितगृहात राहत असल्यास त्या वसतिगृह प्रमुखाचे प्रमाणपत्र अथवा विद्यार्थी भाड्याने राहत असल्यास ज्या ठिकाणी राहत आहे त्या ठिकाणचा विद्यार्थी व मालक यांच्या दरम्यान झालेला भाडे करारनामा (मर्यादा ही दि. ०१ ऑगस्ट २०२४ ते ३० मे २०२५ पर्यंतची असावी.)
५) जात वैधता प्रमाणपत्र (Validity Certificate)
६) आदिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)
७) आधार कार्डची साक्षांकित प्रत व आधार कार्ड बँकेशी संलग्न केल्याचा पुरावा. (Aadhar Card & Aadhar Linked with Bank proof. )
८) विद्यार्थ्याचे बँक पासबुकची प्रत. (Bank Passbook)
९) पालकांचा सन २०२३-२४ चा उत्पन्न दाखला सदर दाखला हा मा. तहसिलदार यांनी प्रमाणित केलेला असावा.
१०) विद्यार्थी अंपग असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र (Physically Handicapped Certificate)
११) इ.१० वी, १२ वी किंवा डिप्लोमा/डिग्री च्या सर्व सत्र परीक्षेचे निकाल. (10th/12th/Diploma/Degree marksheet)
१२) महाविद्यालयाचे बोनाफाईड सर्टिफिकेट (College Bonafide Certificate)
१३) शै. वर्ष २०२४-२५ मधील महाविद्यालयातील उपस्थितीचे प्रमाणपत्र. (Attedance Certificate)
१४) महाविद्यालयाचे सन २०२४-२५ या वर्षाचे शुल्क भरल्याची पावती.

विद्यार्थ्यांनी सदर अर्जावर महाविद्यालयाची सही व शिक्क्यासह घेऊन आपला अर्ज संबंधित विभागाकडे म्हणजे सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय, विश्रांतवाडी, पुणे येथे स्वत: अथवा त्यांचे पालकामार्फत पूर्वी सादर करावा.

B.R.A.C. TRUST विश्वकर्मा इन्स्टिट्यूट पुणे-३७. Vishwakarma Institute of Technology

प्रबंधक
विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी,पुणे ३७

प्रत: १) सर्व विभाग प्रमुखांना माहितीसाठी, २) सर्व नोटीसबोर्डकरिता, ३) सिस्टीम विभाग प्रमुख यांना महाविद्यालयाचे संकेतस्थळावर नोटीस प्रसिध्द करणेसाठी.